## थोडक्यात महत्त्वाचे



जयसिंगपूर : डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेजच्या स्नेहसंमेलनावेळी उपस्थित नृत्य दिग्दर्शिका डॉ. राजश्री खटावकर, ट्रस्टचे चेअरमन डॉ. विजय मगदूम, व्हाईस-चेअरपर्सन ॲड. डॉ. सोनाली मगदूम, मान्यवर.

# डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेजचे स्नेहसंमेलन उत्साहात

**जयसिंगपूर :** येथील डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेजमध्ये वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन केले होते. अभिनेत्री व नृत्य दिग्दर्शिका डॉ. राजश्री खटावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रातील संधी, मेहनत व सातत्य तसेच जीवनात येण्ऱ्या अडचणींना धैर्याने सामोरे जात प्रयत्न करत राहिल्यास त्याचे सकारात्मक परिणाम निश्चितपणे दिसून येतात, असे सांगितले. डॉ. मगदूम ट्रस्टचे चेअरमन डॉ. विजय मगदूम यांनी, जीवनात यशस्वी होण्यासाठी एआय वर प्रभुत्व असायला हवे यासाठीचे मार्गदर्शन केले. व्हाईस-चेअरपर्सन ॲड. डॉ. सोनाली मगदूम यांनी, आजचे विद्यार्थी उद्याचे राष्ट्रनिर्माते आहेत. त्यांच्यातील क्षमतांना चांगल्या संधी मिळाल्यास ते केवळ वैयक्तिक यश मिळवणारच नाहीत, तर समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीतही मोलाची भर घालतील, असे सांगितले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शितलकुमार पाटील यांनी केले. विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक, कलागुणांचे सादरीकरण केले. यावेळी डॉ. मगदूम इंजिनिअरींग कॉलजचे प्राचार्य डॉ. हरीशानंद के. एस., उप-प्राचार्य सतिश किलजे, डॉ. प्रियंका गायकवाड, डिप्लोमा विभाग प्रमुख प्रा. सौ. एस. व्ही. मगदूम उपस्थित होते. आयोजन प्रा. सौरभ समडोळे, प्रा. काशिनाथ हुलवान यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. ऐश्वर्या पाटील, विद्यार्थी प्रतिनिधी हार्दिक कोळी यांनी केले.